# वृक्ष संवर्धनासाठी मेट्रो ३ची विशेष मोहीम

## ३ हजार झाडांचे मूळ जागी वृक्षारोपण; अश्विनी भिडे यांची माहिती




**मुंबई :** पर्यावरणाच्या रक्षणासाठी झाडांचे संवर्धन करणे काळाची गरज आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने वृक्ष संवर्धनासाठी पुढाकार घेतला असून मेट्रो रेल स्थानकाच्या कामांत प्रभावित होणाऱ्या झाडांचे मूळ जागी वृक्षारोपण करण्याची मोहीम हाती घेतली आहे. मुंबई मेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांच्याहस्ते सिप्झ मेट्रो स्थानकांतील इलेक्ट्रॉनिक्स प्रादेशिक चाचणी प्रयोगशाळा परिसरात या मोहिमेचा प्रारंभ झाला.

मेट्रो-३ मधील २६ स्थानकांच्या बांधकामादरम्यान साधारण ३ हजार झाडे प्रभावित झाली होती. दरम्यान, उच्च न्यायालयाला दिलेल्या प्रतिज्ञापत्राप्रमाणे मेट्रो कॉर्पोरेशन हे राज्यातील विविध बागांमध्ये १८ इंच परिघ असलेली तितकीच झाडांची लागवड करणार असून मेट्रो स्थानकांच्या त्याच परिसरात मूळ जागी त्याला पुनर्स्थापित करत आहेत. वृक्षारोपण मोहिमेची सुरुवात वृक्षारोपणातील पॅकेज १९ पासून करण्यात आली असून याअंतर्गत सिप्झ ते धारावीपर्यंतच्या १० स्थानकांचा समावेश होतो. पॅकेज १९ अंतर्गत देशी बदाम, ताम्हण (फुल) आणि पांगारा (फुल) प्रजातींसह १७ स्थानिक प्रजातींची एकूण १०८५ झाडे लावली जातील.